दि.26 जानेवारी,2014

# प्रजासत्ताक दिनानिमित्त काही विचार

श्री अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

भारत देश आज 65 वा प्रजासत्ताक दिवस साजरा करित आहे. आपल्याला आजच्या दिवशी उदार संविधानाची भेट प्राप्त झाली. संसदीय लोकशाही, संघीय रचना, मूलभूत अधिकार, स्वतंत्र न्यायतंत्राद्वारे न्यायिक समीक्षा वगैरे मुख्य वैशिष्ट्यांचा समावेश संविधानात आहे.

देशासमोर विविध आव्हाने पाहायला मिळत आहेत आणि ती आव्हाने दूर करण्यासाठी महान स्थितिस्थापकता असून आपला देश एक मजबूत आणि गतिशील लोकशाही असल्याचे मी मानतो. अशा परिस्थितीत देशाच्या भविष्यासाठीच्या कार्यसूची बाबतची चिंता मला आपल्यासमोर ठेवायची आहे. गरिबी भारतीय समाजात शापासमान बनत आहे. देशाच्या जनतेमधून 30 टक्के लोक गरिबी रेषेच्या खाली जीवन जगत आहेत. गरिबांना गौरवपूर्ण जीवन जगण्याचा अधिकार मिळत नाही. दहशतवाद आणि घुसखोरी भारताच्या सार्वभोमत्त्वासमोर एक मोठी जोखीम बनली आहे. दहशतवादाची जोखीम बाह्य आणि अंतर्गत दोन्ही प्रकारची आहे. सैन्यदलात कपात करणे परवडण्यासारखे नाही. भारतात राजकारणाच्या गुणवत्तेत सुधार करण्याची गरज आहे. राजकारणाची शक्ती खुप आहे. राजकारण्यांची महत्ता राजकारणात असलेल्या विशाल शक्तिनुसार असली पाहिजे.

राजकारणाच्या गुणवत्तेवर मोठा परिणाम होत आहे. भारत आज समाजातील समस्येचा मुकाबला करु शकेल असा शासनाची अपेक्षा ठेवतो. भारतात कुशासन असूनदेखील सरासरी 9% विकासदर आहे, जर राजकारण आणि शासनाच्या गुणवत्तेत सुधार झाला तर विकास दर किती असेल? भारताने अधिक मानवीय आणि दयाळू समाज बनून कार्य करण्याची गरज आहे. खास करुन महिलांच्या बाबतीत आमची चिंता असून आमच्या वर्तनात त्याचे प्रतीबींब उमटतील. महिला आणि त्यांच्या विरोधातील गुन्हेगारीमध्ये जी निर्दयता आचरण्यात येते ते समाजावर कलंक आहे. याव्यतिरिक्त आपल्या समोर आणखी अनेक आव्हाने आहेत. चला ती आव्हाने दूर करण्यासाठी आपल्याला दृढ निर्धार व्यक्त केला पाहिजे.